# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.08.2025** **वारःशनिवार**

---

1. भारत-जपान दरम्यान धोरणात्मक, आर्थिक, तांत्रिक सहकार्यासाठीचा व्यापक पथदर्शी आराखडा जाहीर
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीला उद्या चीनमध्ये उपस्थित राहाणार
3. लेबनान शांतता मोहिमा बंद करण्याचा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा निर्णय
4. चीनमधल्या आंतरराष्ट्रीय मुष्टीयुद्ध प्रशिक्षण शिबिर आणि स्पर्धेत भारतीय कनिष्ठ गटाच्या खेळाडूंची पदकांची लयलूट आणि
5. सात्विकसाईराज आणि चिराग शेट्टी जोडीची जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक

**<u>पंतप्रधान-जपान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी उभय देशांदरम्यान धोरणात्मक, आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य दृढ करण्याच्या उद्देशाने पुढील दशकभरासाठी सुरू राहाणारा व्यापक पथदर्शी आराखडा जाहीर केला आहे. जपानची राजधानी टोकियो इथं झालेल्या शिखर परिषदेनंतर संयुक्त वार्ताहर परिषदेत दोन्ही नेत्यांनी ही घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमांवरून माहिती देताना, भारत-जपान दरम्यानच्या 15 व्या शिखर परिषदेत दोन्ही देशांनी व्यापक द्वीपक्षीय संबंधांचा आढावा घेतला तसेच दोन्ही देशांमधील विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी अधिक मजबूत करण्याबाबत सहमती दर्शवल्याचं नमूद केलं. गुंतवणूक, नवोन्मेष, पर्यावरण, तंत्रज्ञान, आरोग्य, दळणवळण तसंच नागरिकांमधील परस्पर देवाणघेवाण आणि राज्य-प्रादेशिक भागीदारी आदींसंदर्भात हा पथदर्शी आराखडा असल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले....

**अगली दशक के लिए एक रोडमैप बनाया है। हमारे विज़न के केंद्र में इन्वेस्टमेंट, इनोवेशन, इकोनामिक सिक्योरिटी, एनवायरमेंट, टेक्नोलॉजी, हेल्थ मोबिलिटी, पीपल टू पीपल एक्सचेंजेज एंड स्ट्रेट प्रिफ्रेक्शर पार्टनरशिप यह प्रमुख बातें हैं। हमने अगले 10 वर्षों में जापान से भारत में 10 ट्रिलियन येन निवेश का लक्ष्य निर्धारित किया है।**

तसंच चांद्रयान 5 मोहिमेसाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था आणि जपान एरोस्पेस एक्सप्लोरेशन एजन्सी यांच्यातील कराराचंही मोदी यांनी स्वागत केलं. त्याचबरोबर जपानमधील विविध क्षेत्रात पाच लाखांहून अधिक लोकांची दुतर्फा देवाणघेवाण सुलभ करण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलं आहे. संरक्षण आणि नवोन्मेष क्षेत्रात परस्पर सहकार्य भक्कम करण्याचा निर्णयही दोन्ही देशांनी घेतला आहे. यावेळी बोलताना जपानच्या पंतप्रधानांनी भारताच्या जागतिक प्रभावाचं कौतुक केलं तसंच जपानच्या अर्थव्यवस्थेत कुशल भारतीय प्रतिभेच्या एकत्रीकरणाचे आवाहन केलं. सामायिक लोकशाही मूल्यं आणि मुक्त इंडो-पॅसिफिक संबंधांवर भर देत वाढत्या जागतिक अनिश्चिततेच्या काळात दोन्ही देशांनी प्रादेशिक शांतता आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी ताकद एकत्रित करण्याचं आवाहन केलं आहे. पंतप्रधानांच्या जपान दौऱ्याविषयी माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, उभय देशांनी सुरक्षा सहकार्याबाबत संयुक्त घोषणापत्र स्वीकारण्यास सहमती दर्शवली असून, कायद्यावर आधारीत खुल्या, शांत आणि आर्थिकदृष्ट्या गतिमान इंडो-पॅसिफिक प्रदेशासाठी सामायिक दृष्टीकोनाला बळकटी मिळेल.

दरम्यान, भारत आणि जपान दरम्यान काल खनिज संसाधनांसंदर्भात एका सहकार्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्याची माहिती कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी काल दिली. या करारामध्ये महत्त्वपूर्ण खनिज पुरवठा साखळी स्थापन करणं आणि त्यामध्ये विविधता आणण्याच्या प्रयत्नांचा समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं. केवळ ऊर्जा, राष्ट्रीय आणि अन्नविषयक सुरक्षितता ही उद्दीष्टे साध्य करण्यासाठी नव्हे तर शून्य उत्सर्जन उद्दीष्ट्य साध्य करण्यासाठीही हा करार महत्त्वाचा असल्याचं ते म्हणाले.

**<u>एससीओ-चीन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला जपान दौरा संपवून, उद्या चीनमध्ये सुरू होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या 25 बैठकीत सहभागी होत अनेक उच्च स्तरीय चर्चासत्रांमध्ये उपस्थित राहातील. जागतिक प्रशासनासाठी नवीन नियम तयार करण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा आहे. प्रादेशिक सुरक्षितता, संपर्काचं जाळं, शाश्वत विकास आणि सदस्य राष्ट्रांमधील एकता दृढ करणं या मुद्द्यांवर प्रामुख्यानं चर्चा होण्याची अपेक्षा आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग परिषदेच्या अध्यक्षस्थानी असतील. यामध्ये 20 हून जागतिक नेते आणि 10 आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रमुख उपस्थित राहाण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या उपस्थितीमुळं ही महत्त्वाकांक्षी परिषद ठरणार आहे.

**<u>अमित शहा-गणपती मुंबई</u>**

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर गणेशोत्सवासाठी येत आहेत. या दौऱ्यात लालबागचा राजा तसंच बांद्रा, अंधेरी परिसरातल्या बाप्पांचं दर्शनही ते घेणार आहे.तर, केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आज पुणे दौऱ्यावर असून, श्रीमंत दगडुशेठ गणपतीसह शहरांतल्या विविध गणपतींचं दर्शन ते घेणार आहेत.

**<u>जीडीपी</u>**

2025-26 या आर्थिक वर्षाच्या पहिल्या एप्रिल ते जून या तिमाहीत भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या दरात वाढ होऊन तो 7 पूर्णांक 8 शतांश टक्के झाला आहे. गेल्या पाच तिमाहींतील हा उच्चांक आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत या उत्पादनाचा दर जवळपास साडेसात टक्के नोंदवण्यात आला होता.

**<u>पुतीन भारत दौरा</u>**

रशियाचे राष्ट्राअध्यक्ष ब्लादिमीर पुतीन येत्या डिसेंबरमध्ये भारत दौऱ्यावर येणार असल्याची माहिती क्रेमलिनचे परराष्ट्र धोरण सहायक युरी उशाकोव्ह यांनी काल दिली. येत्या सोमवारी जपानमध्ये होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेदरम्यान पुतीन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतील आणि त्यांच्या भारत दौऱ्याविषयी चर्चा करतील. रशियाकडून कच्च्या तेलाच्या खरेदीमुळे अमेरिकेने भारताला अतिरिक्त आयात कर लावल्याच्या पार्श्वभुमीवर ही भेट महत्त्वपूर्ण ठरू शकते.

**<u>केरळ परिषद</u>**

युरोपियन महासंघाच्या सहकार्याने केरळ सरकारने, राज्यातल्या मत्स्यव्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी म्हणजेच ब्लू इकोनॉमीचे केंद्र बनवण्याच्या दृष्टीने, ब्लू टाईडस्-टू शोर्स, वन व्हिजन या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आलं आहे. या परिषदेमध्ये, ब्लू इकोनॉमीमुळे केरळला होणारे धोरणात्मक फायदे युरोपियन महासंघाच्या वैज्ञानिक आणि धोरणात्मक कौशल्याशी जोडण्यासंदर्भात शाश्वत आणि लवचिक जागतिक आराखडा तयार करण्याबाबत परिषदेत चर्चा आणि परस्पर संवाद होतील.

**<u>ट्रम्प-हॅरिस सुरक्षा</u>**

अमेरिकेच्या माजी राष्ट्रपती कमला हॅरीस यांची गुप्त सेवा संरक्षण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काढून घेतल्याचं अमेरिकेच्या एका वृत्तसंस्थेने व्हाईस हाऊसच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिले आहे. माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी

हॅरिस यांच्या सुरक्षा व्यवस्थेला 2026 पर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र ही सुरक्षितता 1 सप्टेंबरला थांबवण्यात येणार असल्याचं व्हाईट हाऊसनं स्पष्ट केलं आहे.

**<u>लेबनॉन शांतता</u>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं लेबनानमधील शांतता मोहिमा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेमध्ये जवळपास 1000 भारतीय सैन्य दलं सामील आहेत. दक्षिण लेबनानमध्ये शांतता राखण्यासाठी संघर्ष करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांचं अंतरिम दल दोन वर्षांत बंद करण्याचा निर्णय काल घेतला. या सैन्याची मुदत या आठवड्याच्या शेवटी संपत होती, त्याला 2026 पर्यंत शेवटची मुदतवाढ देण्यात आली आहे. या काळात सुरू असलेली अभियाने सुरक्षित आणि व्यवस्थितपणे संपवण्यासाठी एक वर्षाची आणखी मुदत देण्यात आली आहे. या सैन्यात 903 भारतीय सैनिकांचा समावेश आहे.

**<u>राष्ट्रकुल स्पर्धा</u>**

भारताने 2030 मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा अधिकृत प्रस्ताव काल सादर केला. बहुक्रीडा स्पर्धांचं पुन्हा देशात आणण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे. कॉमनवेल्थ गेम्स असोसिएशन ऑफ इंडिया आणि गुजरात सरकारच्या प्रतिनिधी मंडळाने काल लंडन इथं राष्ट्रकुल क्रीडा महासंघाकडे औपचारिक बोली सादर केली.

**<u>भारत्तोलन</u>**

अहमदाबाद इथं सुरू असलेल्या राष्ट्रकुल भारत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत, भारताच्या दिलबाग सिंग ने 94 किलो वजनी गटात रौप्य तर महिलांच्या 86 किलो वजनी गटात वंशिता वर्माने कास्यपदक जिंकले. पुरूषांच्या सामन्यात मलेशियाच्या मोहम्मद स्याहमीने सुवर्णपदक जिंकले. तर मुलींमध्ये ऑस्ट्रेलियाच्या आयलीने सुवर्ण पदक, तर न्यूझीलंडच्या लिटियाने रौप्य पदक जिंकले. आज स्पर्धेचा शेवटचा दिवस आहे.

**<u>बॉक्सिंग ज्युनिअर</u>**

चीनमध्ये 17,19, 23 वर्षांखालील आंतरराष्ट्रीय मुष्टीयुद्ध प्रशिक्षण शिबिर आणि स्पर्धेत भारतीय कनिष्ठ गटाच्या खेळाडूंनी 26 पदके जिंकली. मुलींच्या संघाने अंतिम फेरीत पाच सुवर्ण, पाच रौप्य आणि सहा कास्य पदकांसह वर्चस्व गाजवले. यामध्ये विविध वजनी गटांमध्ये पदके मिळवली. तर मुलांच्या गटात दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि सहा कास्य पदके मिळवली. या दलामध्ये 20 मुले आणि 29 मुली सहभागी होत्या.

**<u>बॅडमिंटन</u>**

पॅरीसमधल्या जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या पुरुष जोडीने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. जागतिक क्रमवारीत 9 व्या स्थानावर असलेल्या या जोडीने उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाच्या दुसऱ्या मानांकित जोडीचा 21-12, 21-19 असा पराभव केला. आज ही भारतीय जोडी जागतिक क्रमवारीत 11 व्या स्थानावर असलेल्या चीनच्या ली यिऊ आणि बो यंग चेन या जोडीशी लढेल. दरम्यान, पी व्ही सिंधू आणि भारताची मिश्र दुहेरी जोडी तनिशा क्रस्टो आणि ध्रुव कपिला यांना उपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.